# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७ वा ❑ रविवार दि.०२ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## एआयचे आव्हान

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य




एआय नोकऱ्यांसाठी मोठे आव्हान म्हणून समोर येत आहे. यामुळे प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक कौशल्य स्तरावर समस्या निर्माण होऊ शकतात. आर्थिक सर्वेक्षणानुसार नवीन युगातील तंत्रज्ञान, म्हणजेच एआय मुळे उत्पादकता वाढेल, परंतु काही क्षेत्रांमध्ये रोजगारावरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

कामाच्या पद्धतीत मोठा बदल होईल आर्थिक सर्वेक्षणानुसार, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या आगमनाने सर्व क्षेत्रातील नोकऱ्यांवर परिणाम होऊ शकतो.

एआय मुळे भविष्यात काम करण्याच्या पद्धती बदलू शकतात. या बदलांपासून भारत दूर राहू शकणार नाही. जसजशी एआय आधारित प्रणाली अधिक स्मार्ट होत जाईल, तसतशी ती लवकर स्वीकारलीही जाईल. त्यामुळे त्याचा परिणाम नोकऱ्यांवर होणार आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या फ्युचर ऑफ जॉब्स अहवालात २०२५ मध्ये भारतात २०३० पर्यंत ९२ दशलक्ष नोकऱ्या या कालबाह्य होतील असे नमूद केले आहे. त्याचबरोबर १७० दशलक्ष नवीन नोकऱ्या निर्माण होणार असल्याचे देखील अहवालात म्हटले आहे.

कॅशियर आणि प्रशासकीय सहाय्यकांसारख्या भूमिका सर्वात वेगाने कमी होत आहेत. त्यांच्यासोबत ग्राफिक डिझायनर सारख्या इतर क्षेत्रात घट होण्याची शक्यता आहे, ऑटोमेशन मुळे ४१ टक्के कंपनी त्यांचे कर्मचारी कमी करण्याच्या तर ७७% लोक त्यांच्या कामगारांना कौशल्य वाढवण्यासाठी योजना आखत आहेत. सर्वात वेगाने घडणाऱ्या पाच नोकऱ्यांच्या यादीत कॅशियर आणि तिकीट क्लार्क हे सर्वात वर आहेत प्रशासकीय सहाय्यक आणि कार्यकारी सचिव, इमारत काळजीवाहू सफाई कामगार, आणि घरकाम करणारे मटेरियल रेकॉर्डिंग आणि स्टॉक कीपिंग क्लर्क, आणि प्रिंटिंग व संबंधित ट्रेड कामगार यांचा क्रमांक लागतो त्यानंतर अकाउंटिंग, बुक कीपिंग, आणि पेरोल क्लर्क, आणि ऑडिटर ट्रान्सपोर्टेशन अटेंडंट, आणि कंडक्टर, सुरक्षा रक्षक, बँक टेलर, आणि संबंधित क्लार्क यांच्या नोकऱ्यात वेगाने घट होईल असे देखील अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

**२०२०पर्यंत ए आय सायबर सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्यांची चलती:**

२०३०पर्यंत वेगाने वाढणाऱ्या कौशल्यांमध्ये एआय, बिग डेटा, नेटवर्क आणि सायबर सुरक्षा तांत्रिक साक्षरता, व सर्जनशील विचार, यांचा समावेश असेल त्यानंतर लवचिकता, चपळता, कुतुल आणि आजीवन शिक्षण नेतृत्व, आणि सामाजिक प्रभाव, प्रतिभा व्यवस्थापन, विश्लेषणात्मक विचार आणि पर्यावरणीय व्यवस्थापन यांचा समावेश असेल पाच वर्षात वेगाने वाढणाऱ्या नोकऱ्यांच्या यादीत शेती, कामगार मजूर आणि इतर कृषी कामगार आघाडीवर असतील त्यानंतर हलके ट्रक किंवा डिलिव्हरी सेवा चालक सॉफ्टवेअर आणि अप्लीकेशन डेव्हलपर्स, बांधकाम शेतकरी, फिनिशन आणि संबंधित ट्रेड कामगार, आणि दुकानातील विक्रेते असतील असे देखील अहवालातून नमूद करण्यात आले आहे.

अलिकडच्या काळात रोबोट आणि 'एआय'मुळे मानवी नोकर्या जाण्याशी संबंधित बातम्या वर्तमानपत्रांचे मथळे बनू लागल्यात.

मागीलवर्षी जुलैमध्ये एक बातमी आलेली होती की, बंगळुरूच्या एका स्टार्टअपने त्यांच्या ९० टक्के कर्मचाऱ्यांना नारळ देऊन त्याजागी एआय चॅट बॉट्सची वर्णी लावली.

या कंपनीचे संस्थापक सुमित शाह यांनी ट्वीट केलं की, ग्राहकांचा प्रतिसाद वाढलेला असला तरी खर्च ८५ टक्क्यांनी कमी झालाय.

पहिलं ओपन एआय टूल 'चॅट जीपीटी'ने रातोरात वर्तमानपत्रांच्या मथळ्यांची जागा घेतली आणि आता अनेक कंपन्या विविध क्षेत्रांसाठी खास एआय टूल्स विकसित करताहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये काहीसं चिंतेचं वातावरण निर्माण झालंय.

तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, लोकांनी एआयला धोक्याची घंटा न समजता उपयुक्त गोष्ट मानून त्याचा वापर करायला शिकलं पाहिजे. यामुळे त्यांची चिंता दूर होईल आणि ते स्वत:ला एक सक्षम कर्मचारी बनवू शकतील.

# महिलांना कायदे आणि त्यांचे हक्क समजावून सांगण्यास असमर्थ ठरलो

## ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची खंत

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**पुणे** – न्यायदेवता डोळ्यावरील पट्टी काढून महिलांना न्याय देण्याचे काम करीत आहे. पण दुर्दैवाने आजही महिला व मुलींवर होणाऱ्या अत्याचाराबाबत दाद मागण्यासाठी कोणते कायदे आहेत? त्यांचे काय हक्क आहेत हे समजून सांगण्यात आम्ही असमर्थ ठरलो आहोत अशी खंत व्यक्त करीत, महिलांवरील अत्याचारासंबधीचे कायदे महिलांना समजेल अशा सोप्या मराठी भाषेत कळण्यासाठी पुस्तिका काढायला हव्यात अशी सूचना ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांनी शासनाला केली. तर फौजदारी व दिवाणी न्यायालयांमध्ये निकालपत्र मराठी भाषेत देण्यासाठी मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी,' असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

विश्व मराठी संमेलनाच्या आचार्य प्र. के. अत्रे मंचावर (ॲम्फी थिएटर) 'महिलांविषयक कायदे व न्याय मराठी भाषेत' या विषयावरील परिसंवादात डॉ. गोऱ्हे आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्वल निकम यांनी आपले विचार मांडले. कायद्याच्या चौकटीत मराठी भाषेचा परिणामकारक वापर केल्यास महिला आपल्या हक्क-अधिकारांबाबत जागरूक होतील. त्यातून पीडितांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल,' अशी मांडणी दोन्ही मान्यवरांनी केली. ॲड. अनुराधा परदेशी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, १९८० नंतर महिलांविषयक कायद्यांमध्ये विविध बदल झाले आहेत. पोलिसांपासून न्यायव्यवस्थेत लिंगभाव संवेदनशीलता आली आहे. त्यातून न्यायव्यवस्था सक्षम होत असून, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्र सरकारने सर्व फौजदारी आणि दिवाणी न्यायालयांची भाषा मराठी असेल हा निर्णय घेतला आहे. परंतु, अद्याप दोन्ही न्यायालयांमध्ये निकालपत्रे मराठी भाषेतून दिली जात नाहीत. त्यासाठी अनुवादक आणि प्रतिवेदकांची संख्या कमी असून, ही अडचण दूर करण्याची कार्यवाही मराठी भाषा विभागाने करावी.'

ॲड. उज्वल निकम म्हणाले की, 'कायद्याची भाषा ही सर्वसामान्यांना समजेल अशा प्रकारची असावी. महिलांनीही आत्मविश्वास जागवून मातृभाषेच्या आधारे आपल्यावरील अत्याचारांना वाचा फोडत न्याय मागितला पाहिजे. अत्याचारविरोधी कायद्यांमधील कठीण शब्दांना सोपे पर्यायी शब्द शोधले पाहिजेत.



बदलापूरचा गुन्हा गुड टच बॅड टच मुळे उघड झाला. मुलीच्या आईला आम्ही आईला विचारले तुम्हाला मुलीवर अत्याचार झाल्याचे कसे कळले?त्या म्हणाल्या मी दोन दिवसांपूर्वी मुलीला गुड टच बॅड टच बद्दल सांगितले होते. मुलीने आपणहून आम्हाला बॅड टच सांगितला आणि आरोपी कोण होता तेही सांगितले असल्याचे ऍड उज्वल निकम यांनी सांगितले.

जेंडर पॅरिटी' (लिंगभाव समानता) आणण्यासाठी देशात समान नागरी कायदा लागू झाला पाहिजे. त्यातून महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा लागू होईल,' असे संकेत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी दिले.

# श्रीयश प्रतिष्ठानद्वारे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात

## इंजिनीअरिंग, पॉलिटेक्निक, फार्मसी, एमबीए, आयुर्वेद आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश प्रतिष्ठानद्वारे त्यांच्या टेक्निकल कॅम्पसमध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री व विद्यमान खासदार डॉ. भागवत कराड होते. श्रीयश प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथींच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदनाने झाली. यानंतर एनसीसी विद्यार्थ्यांनी परेड सादर केली. तीन तुकड्या – वरिष्ठ, कनिष्ठ आणि मुलींच्या अश्या एकूण बासष्ट एनसीसी कॅडेट्सने या परेडमध्ये सहभाग घेतला. परेडचे नेतृत्व एएनओ व लेफ्टनंट प्रा. बृजभूषण शुक्ला यांनी केले.

डॉ. भागवत कराड यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून प्रेरणादायी भाषण केले. त्यांनी ''रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म'' या त्रिसूत्रीने भारताला एक विकसित राष्ट्र बनवून विश्वगुरु बनवायचे आहे, असे सांगितले. तसेच, भारतीय संविधानाचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि आजच्या पिढीच्या योगदानाची आवश्यकता यावर त्यांनी प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करून जीवनात यशस्वी होण्याचा आणि देशाच्या विकासात योगदान देण्याचा कानमंत्र दिला. कार्यक्रमात इंजिनीअरिंग, पॉलिटेक्निक, फार्मसी, एमबीए, आयुर्वेद आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषणे, देशभक्तिपर गीते आणि देशातील वर्तमान परिस्थितीवर आधारित मूकनाट्य सादर केले. कार्यक्रमात श्रीयश म्युझिकल क्लबचे प्रमुख प्रा. अरविंद वाव्हळे आणि त्यांच्या टीमने देशभक्तिपर गीते सादर केली.

या प्रसंगी इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्पुटर विभागाचा विद्यार्थी पृथ्वीराज दौड याचा सत्कार करण्यात आला. त्याने नामांकित श्रेयांश कोडिंग स्कूल, भोपाळ येथे आयोजित रिइमॅजिन राष्ट्रीय कोडिंग हॅकेथॉनस्पर्धेत देशभरातील सातशेहून अधिक महाविद्यालयांमधून आलेल्या स्पर्धकांमध्ये दुसरे स्थान मिळवले. त्याने पन्नास हजार रुपयांचे बक्षीस व



ट्रॉफी जिंकली. त्याला विभागप्रमुख डॉ. जयंत महाजन व त्यांच्या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. पृथ्वीराजचे वडील प्रकाश दौड यांचीही विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात शैक्षणिक उपक्रमांच्या श्रीयश प्रतिष्ठानच्या ई-न्यूजलेटरचे विमोचनही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. गजानन पारीख यांनी केले.

# वरोऱ्यात अखिल भारतीय व्हॉलीबॉल स्पर्धा

## देशभरातून नामांकित संघांचा सहभाग

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**वरोरा** – वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा व लोक शिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने स्वर्गीय खासदार बाळूभाऊ धानोरकर स्मृती प्रित्यर्थ अखिल भारतीय खासदार चषक पुरुष व महिला व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन



दिनांक १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान लोकमान्य महाविद्यालयाचे मैदानावर करण्यात आलेले आहे. स्पर्धे करिता विद्युत प्रकाश झोतातील दोन मैदाने तयार करण्यात आले असून, खासदार प्रतिभा धानोरकर यांचे पुढाकाराने होणाऱ्या या स्पर्धेमध्ये पुरुष गटात प्रथम पारितोषिक १ लाख रुपये रोख व चषक, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये रोख व चषक, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये रोख चषक, चतुर्थ पारितोषिक २५ हजार रुपये रोख व चषक तसेच महिला विभागात प्रथम पारितोषिक ७५ हजार रुपये रोख व चषक, द्वितीय पारितोषिक ५० हजार रुपये रोख व चषक ,तृतीय पारितोषिक २५ हजार रुपये चषक ,चतुर्थ पारितोषिक १५ हजार रुपये चषक तसेच इतर वैयक्तिक रोख बक्षिसे देण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये बंगाल ,ओरिसा, तेलंगाना, तामिळनाडू, केरळ, मध्य प्रदेश, पंजाब, गुजरात व महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा भरणा असलेले नामांकित पुरुष व महिला संघ सहभागी होत आहे. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता लोकशिक्षण संस्था वरोडाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील सर यांचे मार्गदर्शनात आयोजन समितीचे अध्यक्ष मानस बाळूभाऊ धानोरकर व वरोरा स्पोर्ट्स फाऊंडेशन वरोराचे अध्यक्ष गजानन जीवतोडे यांचे नेतृत्वात, आयोजन समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते व खेळाडू अहोरात्र परिश्रम घेत आहे.

## लक्षवेधी छायाचित्र....




एका तळ्यात होती.....

(छाया – संजय दारमवार, मुंबई)





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...

## सौंदर्यदृष्टी व उपयुक्तता ह्यांचा मिलाफ असावा

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या स्वप्नातल्या घराचं वेगळेपण अनुभवताना आणि त्यासाठी संरचना निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. खरं म्हणजे, आपली आणि आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपल्या घरावरूनच होत असते. या सर्व दृष्टिकोनातून वरील सर्व बाबी किती महत्वाच्या असू शकतात हे जाणून घेऊन आपली सजकता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो.

बदलत जाणारे जीवनमान आणि काळाची गरज म्हणून घराच्या बांधकाम पद्धतीत तसेच अंतर्गत सजावटीत देखील आमुलाग्र बदल घडत गेले आहेत. घराच्या बाबतीत केवळ निवारा असा माफक दृष्टिकोन राहिला नसून तो खूपच व्यापक झाला आहे. आपल्या घराचं स्वप्नं साकारताना आणि आपलं घर खास करून सजवताना आपण नेहेमीच चिकित्सक असतो. आपली ''घर'' या सज्ञेची व्याख्याच निराळी असते. आपलं घर म्हणजे जणू काही आपला श्वासच असतो. आपल्या प्रत्येकाची घराविषयीची संकल्पना आणि एकूणच घराच्या बांधकाम तसेच गृहसजावटीच्या बाबतीतली व्याख्याच वेगवेगळी असते. आपलं हक्काचं, स्वतःचं घर कल्पकतेने बांधण्याकडे, ते सजवण्याकडे प्रत्येकाचाच कल निराळा असतो.

पै पै जमवलेली जमापुंजी आपल्या स्वतःसाठी अथवा घरासाठी वापरताना आणि मुख्य म्हणजे ती मिळवताना तसेच जमवताना अनुभवलेल्या प्रत्येक क्षणाची आठवण आपल्याला झाल्याशिवाय राहात नाही. आपलं प्रत्येक स्वप्न साकार होत असताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या पैशाची यथायोग्य बचत करणंही तितकेच जरुरीचं असतं. सद्य:स्थितीत अनेकवेळा साधेपणा म्हणजे भोळेपणा किंवा गबाळेपणा समजला जातो.

## तू गाये जा...

ज्योतिर्मय साहित्य


(मागील अंकावरून)

याच काळात महाराष्ट्रात विविध ठिकाणी गीत रामायणाचे आणि सुगम संगीताचे कार्यक्रम करण्याची संधी त्यांना मिळाली यातूनही त्यांच्या गायनात परिपक्वता येत गेली. मराठी चित्रपटांप्रमाणेच अनेक नाटकांमध्ये पार्श्वगायनाची संधीही त्यांना मिळाली. त्यामध्ये यज्ञ, दुभंग, प्रतापगड, भक्तीमहिमा, दुर्गा झाली गौरी, वृक्षवल्ली आम्हा, सत्य महाभारत अशा नाटकांचा समावेश आहे.१९७५ च्या सुमारास दूरदर्शनवर झालेल्या किलबिल या कार्यक्रमात त्यांनी काही बालगीते गायली. याच कालावधीत प्रसिद्ध संगीतकार दशरथ पुजारी यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली रिमझिम झरती श्रावणधारा.. हे गीत गायले. काही गीते सुरेश वाडकर यांबरोबर गायली. दिल्ली दूरदर्शनवरही कार्यक्रम झाले. मुंबई आकाशवाणीवर भावसरगम या कार्यक्रमात गजानन वाटवे, श्रीनिवास



केसकर, प्रभाकर पंडित, यशवंत देव, भूमानंद बोगम यांच्यासारख्या संगीतकारांनी त्यांच्याकडून विविध लोकप्रिय गीते गाऊन घेतली आणि एक गायिका म्हणून चारुशीला बेलसरे हे नाव महाराष्ट्रात आणि महाराष्ट्र बाहेरही रसिकमान्य झाले.

पं सी आर व्यास हे शास्त्रीय संगीतातील मोठे व्यक्तिमत्व !




त्यांनी चारुशीला यांना सहा वर्ष शास्त्रीय संगीत शिकवले. ग्वाल्हेर घराण्याची गायकी आणि बसंत, मालकंस, अहिरभैरव, यमन आदी विविध राग त्यांनी शिकवले. फुल खिले है गुलशन गुलशन हा लोकप्रिय कार्यक्रम मुंबई दूरदर्शनवर सादर करणाऱ्या बेबी तबस्सुम यांच्याबरोबर चारुशीला यांनी अनेक ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम तबस्सुम हिट परेड या नावाने केले केवळ पाच वर्षात जवळपास २००० कार्यक्रम संपूर्ण भारतभर त्यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये नामवंत कलाकारांची हजेरी असायची.

कोणाही व्यक्तीला आपला शिष्य म्हणून सहजपणे न स्वीकारणारे ज्येष्ठ गायक पं. भीमसेन जोशी यांनी जेव्हा चारुलता यांचा आवाज ऐकला, तेव्हा त्यांना शिकवण्याचे मान्य केले आणि पंडितजींनी कडून त्या किराणा घराण्याची गायकी शिकल्या. या काळात त्या एसएनडीटी महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठात संगीत शिकवत होत्या. परंतु गायन शिकायचे तर त्यासाठी वेळ दिला पाहिजे असे पंडितजींनी सांगितल्यावर त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला. आणि पूर्ण वेळ संगीताला वाहून घेतले. पंडितजींनी जवळपास दहा वर्षे त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यांची अवस्था देता किती घेशील दो करांनी अशी झाली.

आपणा सर्वांना मोहन जोशी हे नाव उत्तम अभिनेते म्हणून माहिती आहे परंतु ते उत्तम गाताततही हे फार थोड्या लोकांना माहिती असेल. त्यांच्यासोबत चारुशीला यांनी गोविंदा आला रे या ऑर्केस्ट्राच्या कार्यक्रमामध्ये अनेक गीते गायली. साक्षात स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासमोर त्यांची गाणी त्यांनी गाऊन दाखवली आणि लतादीदींनी त्यांचे खूप कौतुक केले. मॉम कॅसेट कंपनीने त्यांची हिट्स ऑफ लता ही कॅसेट प्रसारित केली. ती अतिशय लोकप्रिय ठरली. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

ज्योतिर्मय साहित्य

## अध्यात्मिक सभेचे विषय व तेथील कार्यक्रम

प्रेमळ, पंडीत, पुराणीक, विद्वान वैदिक, भगवंताच्या कथा,हरी किर्तने, वेदांचे व्याख्यान, पुराणांचे प्रवचन अध्यात्मिक विद्येत जे अनेक भेदाभेद आहेत त्यावर चर्चा होते.

२)भक्त प्रेमळ,भाविक, सखोलज्ञानी,सात्त्विक, रसाळ गायक प्रत्यक्ष भगवंत समोर ऊभा करण्याचे सामर्थ्य लाभलेले विद्वान गायक

३)कर्मनिष्ठ, आचारनिष्ठ दानशूर, धर्मनिरपेक्ष, धर्मनिष्ठ पवित्र, पुण्यशील शुध्द अंतःकरणाचे समाजातील लोक.

४)विरक्त, योगी, इंद्रिय निग्रहाने चालणारे तापसी, विरक्त, निस्पृह, करण्यात रहाणारे साधुसंत.

५)मनजिंकणारे महासाधु, तिर्थवासी,तपस्वी पुरश्चरण करणारे तर जनात राहुन जनापासुन अलीप्त रहाणारे

६)योगी, विद्वान, ऋषीश्वर, धुर्त, तारर्कीक, महाकवी मनोजय केलेले मोठे मुनी


७)ब्रम्हज्ञानी, आत्मज्ञानी, पिंडज्ञानी, शरीरज्ञानी, योगाभ्यासी, योगज्ञानी, ऊदासीन अध्यात्मिक सभेत शाश्वत व अशाश्वत यावर सतत विचार मंथन केलेले असते.

**अध्यात्मिक सभेचा फायदा –**

प्रिय वाचक सज्जन मित्रांनो मी सुरवातीला म्हणाले आहे की समर्थाच्या मते परमार्थाची आवड असणारेच अत्यंत धिराची सत्वगुणांनी भारलेली विद्यासंपन्न, कलासंपन्न माणसेच एकत्र येतात. त्याच प्रमाणे प्रव्यस्त, प्रापंचीक, परमार्थी, ग्रहस्थाश्रमी, वानप्रस्थाश्रम वासी, संन्यासी, तरूण,म्हातारे कोतारे, स्त्री, पुरुष सर्वजण सर्वव्यापी परमेश्वराची आराधना करण्यासाठी त्याचे गुणग्राह्य आपल्यात सामावण्यासाठी ह्रदयात भगवंताचे ध्यान करतात. अशा भगवंत प्रेमींना माझा

श्री राम जय राम जय जय राम

इति श्री दासबोधे गुरूशिष्य संवादे सभास्तवननाम समास आठवा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम आणि सत्कर्म

ज्योतिर्मय साहित्य

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा एखादा मनुष्य नुसते तोंडाने राम राम म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग राम राम म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ?

वास्तविक, नाम हे स्वतःसिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण जेथे माझे नाम तेथे मी पुरूषोत्तम असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन्ही गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम घेणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा कसे हा प्रश्नच उद्भवत नाही. किंबहुना नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाराची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच. परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, ''तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे नाम हे होय.'' त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने रामा ! अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

सत्कर्माचा शेवट भगवंताच्या नामाचे प्रेम उत्पन्न होण्यातच होणे जरूर आहे.

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## वृष्टी करणाऱ्या पावसाची निंदा करु नये

ज्योतिर्मय साहित्य

उन्हाळ्यातील उकड्याने हैराण झालेले आपण पावसाची वाट बघत असतो. मग येणाऱ्या एखाद्या पावसाच्या सरीने पण आनंदित होतो. पावसाचे स्वागत करतो. वर्षा सहली काढतो. गरम पदार्थांचा आस्वाद घेतो. असे करता करता काही दिवसातच पावसाला कंटाळतो. काहींना तर सुरुवातीचा पाऊस पण नको वाटतो. आणि सुंदर पावसाचे नकोशा पावसात रूपांतर होते. अर्थात पाऊस तोच असतो. पण आपलीच मनःस्थिती बदलत असते. त्यामुळे पावसाची निंदा सुरु होते. आणि पावसाचे तोटे सांगणारे वक्तव्य सुरु होते. तक्रारी सुरु होतात. कपडेच कसे वाळत नाहीत. दमट वास येतो. प्रवास कसा अवघड होतो. पाणी कसे साठते असे विषय चर्चिले जातात. त्यात घरी असणारी मंडळी फारच आघाडीवर असतात. कामावर जाणारे आपला बंदोबस्त ( पावसा पासून सुरक्षित राहण्याचा ) करुन आपले कर्तव्य करुन येतात. पण ज्यांना कुठेही जायचे असते अशी मंडळीच किती हा पाऊस असे म्हणून तक्रार करत असतात. एकूण काय पाऊस यावर सगळीकडे टीका सुरु होते. आणि आपल्यालाच हवासा असणारा आणि आवश्यक असणारा पाऊस आपण विसरतो.

पण आपण एक विचार करुन बघू या. ज्या काही अडचणी पावसामुळे येतात असे वाटते त्या खरंच पावसामुळे आल्या आहेत का? रस्त्यावर पाणी साठणे, खड्डे पडणे, पूर येणे अशी संकटे मानव निर्मित आहेत. या सगळ्यासाठी आपणच कुठेतरी जबाबदार आहोत. आणि हे आपण टाळू शकतो. हे पूर्ण आपल्या हातात आहे.

आपण हे लक्षात घ्यायला हवे, निसर्गाला सगळे जग सावरायचे असते. जगवायचे असते. पाऊस हा जीवसृष्टीचा आधार आहे. तो आला नाही तर जीवन अशक्यच आहे. गवत,धनधान्य,भाजीपाला उगवणार नाही. एवढेच नाही तर आपल्याला कोणालाच प्यायला पाणी सुद्धा मिळणार नाही. सगळे चराचर कोमेजून जाईल. म्हणून आपल्या संस्कृतीत वर्षा देवता म्हणतो. ही वर्षा देवता जीवनदायी आहे. म्हणून पूर्वापार तिची पूजा करतो. म्हणून अशा जीवनदायी वृष्टी करणाऱ्या ''पावसाची निंदा करु नये.''



नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**कृमिकुलचितं लालाक्लिन्नं विगन्धि जुगुप्सितं**
**निरुपमरसं प्रीत्या खादन्नरास्थि निरामिषम् ।**
**सुरपतिमपि श्वा पार्श्वस्थं विलोक्य न शङ्कते**
**न हि गणयति क्षुद्रो जन्तुः परिग्रहफल्गुताः ।।**

अर्थ – किड्यांच्या पुंजक्याने युक्त, लाळीने ओले, दुर्गन्धी, घृणास्पद आणि मांसरहित अशा हाडाला कुत्रा मोठ्या चवीने खातो. तेव्हा तो इन्द्र जरी जवळ आला, तरीही भयभीत होत नाही. अधम मनुष्य त्याने प्राप्त केलेल्या वस्तूच्या हेयतेचा विचार करीत नाही.

अधम मनुष्य आपल्याजवळ जे आहे, ते कितीही घृणास्पद असले, तरीही त्या बद्दल तो कसलीही घृणा बाळगत नाही. त्याच्या मनात जुगुप्सेचा भाव जागृत होत नाही. या विपरीत त्या पदार्थाचा तो आवडीने आस्वाद घेत असतो. तसेच असा घृणास्पद पदार्थ आपल्याजवळ आहे, या विषयी अधम माणूस गर्व देखील करीत असतो. अशा प्रकारे गर्वयुक्त होऊन तो शक्तिमान, प्रतिष्ठित अशा संपन्न माणसालाही तुच्छ लेखत असतो, असा आशय या श्लोकात भर्तृहरींनी अभिव्यक्त केला आहे.




## मायग्रेन (अर्धशिशी); कारणे आणि लक्षणे

मेंदूच्या कार्यामध्ये काही कारणांनी झालेल्या बदलामुळे उद्भविणाऱ्या डोकेदुखीला वैद्यकीय भाषेमध्ये मायग्रेन असे म्हटले गेले आहे.

ही डोकेदुखी अतिशय तीव्र स्वरुपाची असून, कोणत्याही प्रकारच्या आवाजाने, प्रखर उजेडाने किंवा ठराविक वासाने ही आणखीनच बळावते.

मायग्रेनच्या विकारामध्ये डोकेदुखी सोबत क्वचितप्रसंगी डोळ्यासमोर प्रकाशाचे ठिपके येणे, डोळ्यासमोर अंधारी येणे, किंवा उलट्या होणे अशी लक्षणेही दिसू शकतात.


मेंदूमधील रक्तप्रवाहामध्ये बदल झाल्यास किंवा अचानकपणे मेंदूमधील नर्व्ह सिग्नल्स मध्ये काही बदल झाल्यास ही डोकेदुखी उद्भवू शकते.

मायग्रेनची डोकेदुखी उद्भविण्यामागे आणखीही काही कारणे आहेत. कोणत्याही प्रकारच्या ॲलर्जी, शारीरिक थकवा, अपुरी झोप, कोणत्याही प्रकारचा मानसिक तणाव, काही ठराविक औषधांचे सेवन, किंवा अति प्रमाणात मद्यपान ह्या कारणांमुळेही मायग्रेनचा त्रास होऊ शकतो.

मायग्रेनमुळे होत असणाऱ्या डोकेदुखीमध्ये डोक्यामध्ये ठोके पडल्याप्रमाणे डोके दुखत राहते.

तसेच कोणत्याही प्रकारच्या हालचालीमुळे ही डोकेदुखी अजूनच वाढते.

डोके एका बाजूलाच दुखत राहते. आपण असलेल्या ठिकाणी कमीजास्त होत असलेला प्रकाश, किंवा बदलणारे तापमान यामुळेही डोकेदुखी बळावू शकते.



मायग्रेनचा त्रास लहानपणापासून किंवा अगदी तरुण वयामध्ये सुरु होतो.

काही प्रमाणात हा विकार अनुवांशिकही आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

तसेच हार्मोन्स मध्ये निर्माण होणाऱ्या बदलांमुळे किंवा असंतुलनामुळेदेखील मायग्रेन चा त्रास होऊ शकतो.

पुरुषांच्या मानाने स्त्रियांमध्ये मायग्रेनच्या त्रासाचे प्रमाण जास्त आढळते.

जेवणाच्या वेळा अनियमित असणे, किंवा जेवणाला एखाद्या वेळी अजिबात फाटा देणे, वारंवार उपवास करणे हीही कारणे असू शकतात.

मोनोसोडियम ग्लूटामेट वापरून बनविलेल्या खाद्य पदार्थांचे जास्त प्रमाणात सेवन करणे, किंवा सोडा युक्त खाद्यपदार्थ जास्त खाणे या मुळे ही मायग्रेनचा त्रास होऊ शकतो.


अल्झायमर, एपिलेप्सी किंवा तत्सम नर्व्हस डिसॉर्डर असलेल्या रुग्णांमध्येही मायग्रेन हा विकार पहावयास मिळतो.

तसेच आपण घेत असलेल्या काही औषधांमधील रसायने आपल्या शरीराला मानविणारी नसली तरी मायग्रेन होऊ शकते. उदाहरणार्थ, गर्भप्रतिबंधक औषधांमुळे मायग्रेन उद्भविल्याचे पाहिले गेले आहे. मायग्रेनमुळे डोकेदुखीसोबतच मळमळल्यासारखी भावना होऊ शकते. तसेच डोक्याबरोबर मान दुखणे किंवा मान अवघडणे अश्या तक्रारीही उद्भवू शकतात. अश्या वेळी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

तसेच मायग्रेन मुळे जेवण झाल्यानंतर ही परत परत भूक लागू शकते.

क्वचित प्रसंगी डोकेदुखी इतकी वाढते की ती व्यक्ती संपूर्णपणे गोंधळून जाते, आणि आपण कुठे आहोत याचे भानही त्या व्यक्तीला राहत नाही.

।। श्री स्वामी समर्थ ।।




ज्योतिर्मय साहित्य


स्वामी म्हणतात – कुत्र्याचे सारे गुण माणसांनी घेतले; पण इमानदारी नाही घेतली...!!!

स्त्रीच्या गर्भातून जन्म घेवून त्यानेच पाटी लिहिली, ''स्त्रियांना येथे प्रवेश नाही''. कमाल आहे माणसा तुझी...!!!

भरलेलं घर आणि सुंदर मन हे फक्त समाधानी व्यक्तींचेच असते कारण तो व्यक्ती स्वतःकडे जे काही आहे त्यात खुश असतो आणि इतरांचे वाईट व्हावे हा विचार तो कधीच करत नाही..!

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

**ज्योतिर्मय साहित्य**

या तालुक्याच्या गावी जाण्यासाठी बैलगाडीने निघाले. या रस्त्यावर वाटचाल करीत असताना त्यांना एक विस्तीर्ण असे मोकळे माळरान दृष्टीस पडले. या उघड्या माळरानावर दोन विशाल असे सप्तपर्णी वृक्ष त्यांना दिसले. दाट छाया असलेल्या या वृक्षांनी त्यांचे लक्ष वेधून घेतले. ते आपल्या बैलगाडीतून खाली उतरले. त्या विशाल वृक्षांच्या छायेत बसले. त्या वृक्षांच्या शीतल छायेत त्यांची जणू समाधीच लागली. विलक्षण शांतता अनुभवास आली. मनन, चिंतन आणि ध्यान करण्यासाठी ही जागा अतिशय योग्य आहे असे त्यांना वाटले. त्यांनी मग तो चक्क ते माळरान विकतच घेतले. लवकरच त्यांनी त्या रम्य जागी एक छोटी एकमजली बंगली बांधली. ही जागा त्यांना शांतता देणारी वाटली म्हणूनच या बंगलीचं नाव त्यांनी शांतिनिकेतन ठेवलं. हा काळ साधारणपणे १८६३चा. बीरभूम जिल्ह्यात आणि आताच्या बोलपूर शहराजवळ हा शांतिनिकेतनचा परिसर येतो. कोलकात्याच्या उत्तरेस साधारणपणे १५२ किमी अंतरावर हे ठिकाण आहे.

त्या माळरानापासून जवळच एक किमी अंतरावर भुवनडांगा म्हणून एक छोटी वस्ती होती. पाचपंचवीस झोपड्या असलेल्या या वस्तीत प्रामुख्याने दरोडेखोर राहत होते. मोकळ्या माळावरची दोन सप्तपर्णींची झाडे म्हणजे या दरोडेखोरांचे वाटमाराचे ठिकाण होते. हे दरोडेखोर अत्यंत क्रूर आणि कोणत्याही क्षुल्लक कारणासाठी एखाद्याची हत्या करण्यासाठी मागेपुढे पाहत नसत. पण ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचे धनी असलेल्या देवेंद्रनाथांना त्यांची कधीही भीती वाटली नाही. उपनिषदातील मा भै : हा मंत्र त्यांना केवळ माहितीच होता असे नाही तर त्यांनी तो अंगी मुरवला होता. मा भै : म्हणजे भिऊ नकोस. देवेंद्रनाथ त्या ठिकाणी नियमितपणे ध्यान करू लागले. सुरुवातीला त्या दरोडेखोरांनी केवळ उत्सुकतेच्या भावनेतून त्यांचे निरीक्षण केले. पण नंतर त्यांना वाटले की ही व्यक्ती इतरांपेक्षा काहीतरी वेगळी आहे. हळूहळू ते सुद्धा देवेंद्रनाथांच्या जवळ येऊन बसू लागले. आपली सुखदुःखे सांगू लागले. देवेंद्रनाथांच्या सात्विक **(क्रमश:)**


## वाचक मन घडविणारी एक संस्कार संहिता - कस्तुरीगंध

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

भिकारी असला तरी त्यालाही मन आहे. भिक मागून पोट भरत असलं तरी मन आपुलकी, प्रेम, स्नेहानेच हानेच भरतं हे शास्वत सत्य कथा उलगडते. बाप्पा हसला खुदकन आणि आशीर्वाद किती स्वस्त? था कथेतही हा मानवतावाद दिसून येतो. निःशब्द फूल या कथेत गुलाब नावाच्या विदयार्थ्याला शाळा सोडल्याचा दाखल देतांना एका गुलाबाला दुस–या कुंडीत रुजायचं ही कथेतली निवेदनात्मक ओळ आणि चुलत मावशीने उचललेले गुलाबच्या शिक्षणाचे शिव धनुष्य माय आणि माचशीच्या प्रेमाची पावती आहे. उब या कथेतून देवाभाऊ, धुरपदा यांच्या मुलांना आपल्या मुलांच्या अंगावरील स्वेटर देवून लेखक माणुसकीचे दर्शन घडवितांना दिसून येतो.

माय ममता आणि अगतिकता या कथेत आपल्या लेकुरवाळ्या मुलीच्या औषधासाठी पैसे नसतांना तिच्या बाळासाठी मात्र तो बाप पदरमोड करायाला तयार असतो ही अगतिकता अत्यंत अलगदपणाने लेखकाने मांडलेली आहे. भिक्षा देण्याची सवय मोडू नये म्हणून भिक्षेत माती घेणारा साधू आजच्या संधी साधू दुनियेत विरळाच पण लेखक बी. एन. चौधरी यांना तो भेटला आणि ही फकीरी त्यांनी टिपली. आपल्या ज्ञानदानात उपयोगात आणली. त्यांचे हे चपखलपण लेखकाला वेगळं ठरवते. संकल्प या कथेतला खंडवा हा चोर असला तरी चोरी करण्याऐवजी तेथे त्या कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी तो सहा हजार रुपये सोडून जातो. ही बाब अविश्वासार्हा वाटत असली तरी लेखकाने ती रंगवतांना वाचकाच्या मनाला हेलावून




टाकण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला दिसून येतो. या कथेतून जे खळाचे व्यंकटी सांडो, तथा सत्कर्मी रती लाभो या ज्ञानदेवाच्या उक्तीचा प्रत्यय मात्र येतो.

आऊट हाऊस ही कथाही वेट वाचकांच्या मनास हात घालते. वर्ष श्राध्दाला मवत अण्णांची अतृप्त इच्छा अन्नाच्या घासाला कावळ्याचे न शिवणे. मग सुनबाई सरीता आपली चुक कबूल करते आणि तेव्हा कावळा अन्नाला शिवतो, ही लोकभावना लेखकाने कथेत मांडलेली आहे. यात अंधश्रध्दा पसरवणे हा उद्देश नसून मुलांना झालेली आई–वडिलांची अडगळ, प्रश्न स्वरुपात मोडणे हा आहे. त्यामुळे यातली लोकभावना अधोरेखीत न करता एकसंघ कुटुंब भावना अधिक महत्वाची चाटते. खिचडी या कथेतून लेखकाच्या लेखनाची कसोटीच लागली असल्याचे दिसून येते. अत्यंत संवेदनशीलतेने त्यांनी ही कथा लिहीली असून भाऊ आणि बहिण यांच्यातले ते प्रेमामृत आहे. गरीब कुटुंबातील लहान वयाचे भाऊ आणि बहिणीच्या प्रेमाची ही अनुभूती वाचकाच्या डोळ्याच्या कडा निश्चितपणे ओलावते. दिन दिन दिवाळी व गोष्ट मायच्या कल्पकतेची या कथांना कौटुंबिक पार्श्वभूमी आहे. शालेय जीवनात स्काऊट पथकासाठी लेखकाला आवश्यक पायमोजा आईच्या कल्पकतेने कसा मिळाला? मायची कल्पकता आणि प्रसंगावर मात करण्याची शक्कल मायला कशी सुचली? याचे यथार्थ वर्णन कथेत आलेले आहे. दिन दिन दिवाळी मधील लेखकाची समय सुचकता महत्वाची वाटते. जिभाऊ ही कथा देखील अशीच कौटुंबिक पार्श्वभूमीची असली तरी तिच्यातून वडीलांनी मुलाला दिलेला संदेश प्रातिनिधिक आहे. मोठ व्हायचं ते स्वतःच्या पायावर उभं राहूनच असं दुस–याच्या खांदयावर उभं राहून नाही. बापाने मुलाला दिलेली ही शिकवण म्हणजे कुस्तीच्या आखाड्यात बापाने सांगीतलेली गीताच आहे. माय आंबा या कथेतले पार्वतामाय म्हणते दुष्काळाने विहिरी तळे वाटतात, हे तिने पहिलं होतं पण माणसांच्या नात्यातली माणुसकीही आटते. माणूसांची नाती **(क्रमश:)**



पुस्तक परीक्षण

ॲड. विलास मोरे
७५८८००७८६६

# सणांचे बदलते स्वरूप

**ज्योतिर्मय साहित्य**

नुकतीच संक्रांत झाली, आणि सुहासिनींचे हळदीकुंकवाचे कार्यक्रम सुरू झाले. मकरसंक्रांत पासून रथसप्तमी पर्यंत साधारण पंधरा वीस दिवस हे कार्यक्रम चालू रहातात. आज शेजारी उद्या मैत्रणींकडे परवा भीशीच्या मैत्रणींकडे असे किमान एकदिवसाड हळदीकुंकवाला सुवासिनी जातात. अर्थात तिळगुळा बरोबर लुटलेली एखादी वस्तू ही असतेच. प्रत्येक ठिकाणची वस्तू वेगवेगळी असते. प्रत्येक जण आपल्या ऐपतीप्रमाणे किंवा आवडी प्रमाणे वस्तू देतात. काही ठिकाणी अनेक प्रकारच्या वस्तू ठेवलेल्या असतात आणि त्यातून ती दिली जाते. अगदीच खेळीमेळीचे म्हटलं तर सर्व वस्तुंच्या चिठ्ठ्या केलेल्या असतात आणि जीने जी उचलली तिला ती वस्तू दिले जाते. हल्ली सहसा सर्वांसाठी एकच वस्तू ठेवल्याचे पहायला मिळाले. लूट काही का असेना, बाहेर पडण्या बरोबरच मैत्रणींना भेटण्याचा आनंद लूटता येतो. हेच एकमेव समाधान लाभते.

तसं तर हल्ली प्रत्येक सणांच, सोहळ्यांच स्वरूप बदलत आहे. पूर्वी सारखं केवळ सोपस्कार, किंवा साधेपणाने करणं हे आता पहावयास मिळत नाही. नाविन्यता,वेगळेपणा, सुंदरता, झगमगाट, सादरीकरण, इत्यादी गोष्टी पहावयास मिळतात, तर काहींच्या मते भपकेबाजपणा असतो म्हणतात. काहीही असो सण साजरे करण्याच्या पध्दतीत बदल होत आहेत.पूर्वी संक्रांत म्हटल की खिशात तिळगुळा ची पुडी किंवा डबा घेऊन माणसं भेटेल त्या मित्राला देत असत. लहान मुलांचा उत्साह अवर्णनीय असायचा आपल्या शिक्षकांच्या घरी जाऊन मुलं तिळगुळा सह आशीर्वाद घ्यायची.सुवासिनी हळदीकुंकवाला जायच्या लुटायच्या वस्तू साध्या असायच्या घरी उपयोगी पडायच्या, फणी, कंगवा,

हळदीकुंकवाच्या डब्या, स्टिलचे छोटे भांडी, वगैरे वगैरे. हल्ली जसे स्वरूप बदले तसे वस्तू ही नाविन्यपूर्ण येऊ लागल्या कुणी लोणच्याचे पाकीट, कुणी उडीद पापड पँकेट, गुळाच्या छोट्या ढेपी,पाऊच, पर्स, कापडी पिशव्या, अशा लूटीच्या वस्तूंनी घरातील डायनिंग टेबल भरुन जात आहे. कदाचित अर्थिक प्राप्ती उत्तम असल्याने हात ढिला ठेवत असावेत.पण या गोष्टीत उत्साह मोठा पहायला मिळतो.तिळगुळाचे ही विविध प्रकार पहायला मिळतात. साखरेचा पांढरा, रंगीबेरंगी दाणे असणारा काटेरी हलवा, तिळगुळाच्या साखरेच्या व कडक गुळाच्या वड्या, रेवड्या, असे प्रकार खायला मिळतात.

पूर्वी साधेपणाने केला जाणाऱ्या या सणात आता गृह सजावटीने आणखीनच सौंदर्य खुलवले आहे. मोबाईलच्या जमान्यात आता जिथे तिथे, आलेल्या मैत्रणींसह फोटो काढण्याची हौस भागवली जात आहे. मोबाईल मधील सेल्फी कँमेर्यामुळे तर काही ठिकाणी सेल्फी पाँईटस् बनवले जाऊ लागले आहेत. त्या पाँईट जवळ मैत्रणींसह फोटोसेशन होत आहेत. बिचारे फोटोग्राफर यांच्या पोटावर मात्र पाय पडला आहे. एकटीचा,सर्व मैत्रणींचा, सुने बरोबर, आजी बरोबर अशा सेल्फीनी मोबाईल गँलरी ओसंडून वहाते आहे. जसा मनामनातून उत्साह, आनंद वहातोय तसा!!!एक मानसिकता सदृढ करण्याचा एक मस्त फंडा हा आहे. असे मला वाटते.

संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी किंक्रांत येते. हा ही एक सणच आहे. किंक्रांतीला लहान मुलांना म्हणजे दोन एक वर्षाच्या मुलांना बोर न्हान घालतात. घरातील एक दोन वर्षाच्या मुलांना बोरांनी न्हाऊ घातले जाते. ते का?तर ती मुल किरकिर करु नयेत म्हणून !! या ही कार्यक्रमास उत्साह ऐवढा पहायला मिळतो की बस्स!!! लहान मुलाला छान सजवलं जातं, कोणी कृष्णा सारख सजवतात कुणी मस्त गळ्यात माळा नवे कपडे घालून आत्याच्या मांडीवर बसवून घरातील ज्येष्ठ बाई धान्य मोजण्याच्या शेराने न्हाऊ घालते. अलीकडे केवळ बोरांनी नाही तर त्यात आता बोरे, बत्तासे, चाँकलेट, चुरमुरे, असे लहान मुलांना आवडणार्या जिनसांसह न्हाऊ घालतात. लहान मुले आजुबाजुला बसलेली असतात ते त्या खाऊ सह मजा लुटतात. आलेल्या सुवासिनींना हळदीकुंकु देऊन बोरे वगैरे दिले जाते.या ही साध्या कार्यक्रमाला उत्साही इव्हेंटचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

संक्राती बरोबरच इतर ही सणांमध्ये असेच चित्र पहावयास मिळते.गौरी गणपती च्या वेळीही असाच उत्साह पहायला मिळतो.त्या दोन दिवसात या सर्व भगिनींचा उत्साह टिपेला पोहोचलेला असतो. विशेष म्हणजे घरात गौरीची आरास, स्वयंपाक, सगळी घरची इतळ कामं, सडा रांगोळ्या, ऐवढ्यातून हळदीकुंकवाचा त्यांचा उत्साह पाहिल्यावर नवल वाटते. एक उत्साह, वेगळेच तेज त्यांच्यात पहायला मिळते. हल्ली गौराईची आरास ही मोठ्या थाटात केली जाते आहे. सगळी कडे जणू लक्ष्मीचा वास आहे असे वाटते. अगदी वटपौर्णिमा सुध्दा थाटात केली जात आहे.नवरात्रा दरम्यान होणारा भोंडला/हादगा आता लहान मुलींचा राहिला नाही. मोठ्या मोठ्या चौकात स्त्रिया भोंडल्याचे कार्यक्रम सार्वजनिक पध्दतीने साजरे करताना पहायला मिळत आहेत. नागपंचमी सुध्दा आता थाटात संपन्न होते आहे. सण म्हणजे सुहासिनींसाठी एक विरंगुळ्याचे साधन झाले आहे. मनस्वी समाधान यातून मिळत आहे. शारीरिक थकव्याचा साधा विचार ही मनास स्पर्शत नाही. हे विशेष!!!





दत्ता तरलगट्टी
मुक्त पत्रकार
मो. ९८८१६२९०४८

विवाह सोहळे, वाग् निश्चयाचे कार्यक्रम हे सुध्दा आता एका उंचीवर नेले जात आहेत.विविधता आता या सोहळ्यांमध्ये येत आहे. लग्नात पूर्वी ही हळदी लागायच्या पण हल्ली हळदीला सुध्दा सजावट, पिवळ्या रंगाचे पडदे, पिवळ्या खूर्च्या, खास स्टेज, वधुवरांना अंघोळीसाठी मोठा फायबर कलश असतो.बांगड्याच्या कार्यक्रमाला सुध्दा आता छान आरास वगैरे पहायला मिळत आहे. बबब काय काय वेगवेगळे प्रकार पहायला मिळत आहेत काही विचारायला नको. लग्नाच्या वेळी ही वधुवरांना लग्न मंडपात आणण्याचे सुध्दा वेगवेगळे इव्हेंट पहायला मिळतात. सध्या इव्हेंट मँनेजमेंट कोर्स व त्यांच्या विभागाचा असर यात पडत असावा.

काहीही असो सणांचे, सोहळ्यांचे स्वरूप बदलत आहे. लोकांचे जीवनमान उंचावले आहे हेच दिसून येत आहे. या सण सोहळ्यांच्या करण्याने खिसा रिता होत आहे याकडे कुणाचे लक्षच नाही असे वाटते. पण उत्साहाने धुमधडाक्याने ते केले जात आहे. निदान उपस्थितांसाठी एक विरंगुळ्याचे उत्तम साधन मात्र ठरते आहे.घरच्या आणि नोकरीच्या ठिकाणचा आलेला सर्व प्रकारचा ताण नाहीसा करण्यासाठी, तमाम भगिनींसाठी हे सारं प्रचंड आनंदायी, समाधानी,आणि मोठे उर्जा स्त्रोत ठरते आहे.नोकरीच्या ठिकाणी व्यस्त असलेल्या भगिनींना सगळेच सण साजरे करण कुठं जमतं, अधुनिकतेकडे जाणारं समाजमन जरी असलं तरी, कधीतरी आपण छान शोकिन दिसावं,नटून कुठे शेजारपाजारी जाव अस वाटणार्यांसाठी हे हळदीकुंकवाचे कार्यक्रम हायसे वाटतात. अशाही व्यस्त स्त्रिया सण साग्र संगीत साजरे करतांना पहायला मिळत आहे.जरी अधुनिकतेकडे वळलो असलो तरी पारंपरिक गोष्टी आम्ही विसरलो नाहीत हेच यातून अधोरेखित होते. अधुनिकते कडून पुनश्च तरुण तुर्क पुन्हा पारंपरिक सणांकडे वळतो आहे. ह्या विचारसरणीचे श्रेय केवळ सण आणि सणांतील उत्साही वातावरण टिकवून ठेवण्याऱ्या म्हातारे अर्क यांच्याकडे निश्चितच जाईल असे वाटते.

***

# वाढदिवसानिमित्त अंकुश चौधरीच्या पी.एस.आय अर्जुन' चित्रपटाची घोषणा

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी सिनेसृष्टीत आपल्या अभिनयकौशल्याने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारा आणि 'स्टाईल आयकॉन' म्हणून ओळखला जाणारा महाराष्ट्राचा लोकप्रिय अभिनेता अंकुश चौधरीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने चाहत्यांना पहिल्यांदाच एका दमदार पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. पोस्टरमध्ये अर्जुनचा करारी आणि धाडसी लूक दिसत असून प्रेक्षकांसाठी हा चित्रपट म्हणजे एक पर्वणी ठरणार आहे. व्हिस्ट्रोमॅक्स सिनेमा, ड्रिमविव्हर एंटरटेनमेंट निर्मित पी. एस.आय.अर्जुनचे भूषण पटेल दिग्दर्शक आहेत तर विक्रम शंकर आणि ध्रुव दास निर्माते आहेत.

यापूर्वी प्रेक्षकांनी अंकुशला रोमँटिक, ॲक्शन हिरोच्या अंदाजात पाहिले आहे. मात्र या चित्रपटात अंकुश एका वेगळ्याच भूमिकेत दिसणार आहे. सध्या तरी या चित्रपटात कोण कलाकार झळकणार हे समोर आले नसले तरी लवकरच याबद्दलची माहिती प्रेक्षकांसमोर येईल. चित्रपटाचे निर्माते विक्रम शंकर म्हणतात, '' या चित्रपटाच्या माध्यमातून मी मराठी सिनेसृष्टीत निर्माता म्हणून पदार्पण करत आहे. यापूर्वी मी विविध भाषेत चित्रपटांची निर्मिती केली आहे. परंतु मला मराठीबद्दल नेहमीच कौतुक राहिले आहे. मुळात मराठी प्रेक्षक जाणकार आहेत. त्यांना वैविध्यपूर्ण विषय आवडतात. हा विषयही खूप वेगळा आहे आणि म्हणूनच मी या चित्रपटाची



निवड केली. त्यात अंकुश चौधरीसारखा प्रतिभावान अभिनेता या चित्रपटाला लाभला आहे, त्यामुळे हा एक उत्तम योग जुळून आला आहे. अंकुश मराठीतील एवढा मोठा अभिनेता असूनही त्याचे आम्हाला खूप सहकार्य लाभले. आज आमच्या संपूर्ण टीमकडून ही त्याला वाढदिवसाची भेट.''

## दवा-खाना

# लसीकरणाचा जनक- एडवर्ड जेन्नर

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मैत्रांनो!

लोहा लोहे को काटता है हा शोले या सिनेमातील डायलॉग आपल्याला माहित असेलच. असेच कांहीसे झाले स्मॉलपॉक्स या एका गंभीर आजाराबाबत. त्याच्या लसीची मूळ कल्पना कशी कार्यान्वित झाली ते बघू या. पाचव्या शतकापासून किंवा त्याआधीपासूनच देवी किंवा चेचक या महाभयंकर साथीच्या आजारात लाखों रुग्णांचे बळी जात होते. बचावलेल्या रुग्णांत आंधळेपणा आणि त्वचेवर डागांच्या रूपात आपला आजन्म ठसा उमटवणारा हा संसर्गजन्य रोग युरोपात पसरला होता. १०– २० टक्के लोकांना याने ग्रासले होते. आपल्या देशातही ही साथ होतीच. इथे शीतला माता या देवीचा प्रकोप हेच या आजाराचे कारण मानले जात होते.

एडवर्ड जेन्नर

इंग्लंडमधल्या बर्कली नावाच्या लहानशा गावात १७ मे १७४९ रोजी एडवर्ड जेन्नरचा जन्म झाला. त्यांनी वयाच्या चौदाव्या वर्षांपासून लंडनचे प्रख्यात शल्यचिकित्सक जॉन हंटर यांच्याकडे आपले वैद्यकीय शिक्षण सुरू केले. पदवी प्राप्त केल्यावर त्यांना आपल्या बर्कली गावाची ओढ लागली. तेथेच जेन्नरने आयुष्यभर रुग्णसेवा केली. गावात त्यांचे बहुतेक रुग्ण संपन्न शेतकरी होते. त्यांच्याकडे मोठया प्रमाणावर गुरे ढोरे होती. १७८८ साली इंग्लंडमध्ये देवीची सर्वदूर साथ पसरली होती. त्यावेळी गावातल्या गवळीवाड्यातील बहुसंख्य लोक या साथीतून आश्चर्यकारकरित्या बचावले होते. जेन्नर यांच्या लक्षात आले की या बचावलेल्या लोकांना आधी कधीतरी गाईगुरांचा देवीसदृश कांजिण्यांसारखा रोग (काउपॉक्स) होऊन गेला होता. मैत्रांनो, आपल्या लहानपणी आपण कित्येक गोष्टी एका कानाने ऐकतो आणि दुसऱ्या कानाने सोडून देतो, मात्र एडवर्ड यांना आपल्या लहानपणी ऐकलेले एका गवळणीचे शब्द नेहमी आठवायचे. ती म्हणायची, ''मला काउपॉक्स होउन गेलाय, त्यामुळे मला देवी रोग (स्मॉलपॉक्स) होणार नाही.''

मंडळी, आता जेन्नरच्या मनात विचारचक्र सुरु झाले. त्यांना लसीकरणाची सुरक्षित पद्धत शोधून काढायचा ध्यास लागलेला होता. त्यांच्याकडे कुठलीही अद्ययावत प्रयोगशाळा किंवा शहरातील प्रगत संशोधनाची सामग्री नव्हती. पण दुर्दम्य इच्छाशक्ती, दूरगामी कल्पनाशक्ती आणि निरीक्षणाची जबरदस्त हातोटी यांच्या साहाय्याने जेन्नरने एक असा अभिनव प्रयोग केला जो जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदल्या गेला. ८ वर्षाचा जेम्स फिप्प्स हा जेन्नरच्या माळ्याचा मुलगा होता. त्यांनी जेम्सवर १४ मे १७९६ रोजी प्रयोग सुरु केला. जेन्नरने त्याच्या हाताला दोन छोट्या जखमा केल्या. ब्लॉसम नांवाच्या गायीच्या स्तनांवरील फोडांच्या संसर्गांमुळे काउपॉक्स झालेल्या सारा नेल्म्स या गवळणीच्या हातावरील काउपॉक्सच्या फोडातील स्त्राव त्यांनी जेम्सच्या ताज्या जखमांवर चोळला. यानंतर जेम्सला हलका ताप आणि बारीक सारीक तक्रारी दिसून आल्या. याचे कारण म्हणजे गुरांच्या कांजण्या आणि माणसाच्या देवी रोगाचे बऱ्याच अंशी असलेले साधर्म्य. मात्र गुरांच्या कांजण्यांची तीव्रता माणसाच्या देवी रोगापेक्षा फारच कमी असते. जेम्स नवव्या दिवशी पूर्ण बरा झाला. याची पुढची पायरी म्हणजे एडवर्ड यांनी काही आठवड्यांनी देवीच्या रुग्णाच्या पुरळातील स्राव पुन्हा एकदा जेम्सच्या जखमेवर लावला, पण याउप्परही जेम्सला देवीचा प्रादुर्भाव झाला नाही.




लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

मंडळी, 'मैलाचा दगड' ठरलेल्या या धाडसी प्रयोगाचे इत्थंभूत वर्णन जतन करून ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळेच जेन्नरसोबत प्रथम लसीकरणाचा मानकरी जेम्स फिप्प्स, सारा नेल्म्स ही गवळण आणि ब्लॉसम गाय, हे तिघेही लसीकरणाच्या इतिहासात अमरतत्वाला पोहोचले. जेन्नरसाठी ही लसीकरणाच्या प्रयोगाची नांदी होती. म्हणूनच एवढ्यावर न थांबता त्यांनी २३ व्यक्तींवर असेच यशस्वी प्रयोग केले. त्यात त्यांच्या ११ महिन्यांच्या बाळाचा देखील समावेश होता. कुठल्याही विषाणूविषयी ज्ञान नसतांना एडवर्ड जेन्नर यांनी देवी रोगाविरुद्ध लस तयार केली, हेच त्यांचे महान कार्य! अर्धांगवायूच्या झटक्यानंतर २६ जानेवारी १८२३ ला त्यांचे निधन झाले. मैत्रांनो, १४ मे १७९६ सालच्या जेन्नर यांच्या प्रयोगाच्या नांदीनंतर या नाट्याचे भरतवाक्य बऱ्याच कालावधीनंतर लिहिले गेले. देवी रोगाचे समूळ उच्चाटन व्हायला १९७७ साल उजाडावे लागले, कारण या सालच्या ऑक्टोबर महिन्यात जगातील देवीच्या शेवटच्या रुग्णाची नोंद झाली.

मंडळी, पुढील भाग प्रतिजैविकांचा !

**(सेवानिवृत्त प्राध्यापक– वैद्यकीय महाविद्यालयीन फार्माकॉलॉजी विभाग)**



# झुमरी...!



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

इस्लामपूर गातात इनामदाराचे दोन-तीन जुने टोलेजंग वाडे, दोनशे एक्कर जमीन आणि त्याखालोखाल गावातील पाटील, देशमुख व इतर लोकांच्या जमिनी होत्या. पण इनामदाराचा पूर्वीपासून गावात दरारा होता, आणि माझे वडिल, मी त्यांना, '' बा,'' असे म्हणायचो. बा इनामदाराच्या इथे सालगडी म्हणून मळ्यात कामाला. इनामदारांच्या इतर सालगड्यापैकी बा सर्वात जास्त विश्वासू व अनुभवी सालगडी. त्यांनी बऱ्याच वर्षापासून इनामदाराच्या घरात सालगडी म्हणून काम केल्याने इनामदारांसह सर्व इनामदार कुटूंबांचा बा वर फारच विश्वास होता, आणि माझा बापही उभ्या आयुष्यात त्यांच्याशी इमानदारीनेच वागून काम केलेले होते. मग स्वतःच्या घरावर कितीही कठीण प्रसंग आले तरी बा हा इनामदाराच्या कामाला अगोदर महत्व दयावयाचा.

इनामदाराकडे दहा बैलजोडी, वीस ते पंचवीस गाई-म्हशी, शेळ्या-मेंढ्या हे पशुधन असून दहा ते पंधरा सालगडी कामाला राबत होती. बा ला इनामदाराने पाचशे रूपयांच्या उधारीवर एक वृध्द गाय दिली. बा ने ती गाय आनंदाने घरी आणली. घरातील समद्यांना आनंद झाला. मी तर आनंदाच्या भरात जागच्या जागी उडया मारल्या. तसा बा माझ्याकडे आणि एकवेळ गायीकडे पाहून मनातल्या मनात हसला.

घरात आई, मी व माझे लहान तीन भाऊ व एक बहीण असा आमुचा परिवार. आमचे साधे पत्र्यांचे घर. घराच्या शेजारीच चिंचेचे झाड आणि त्या झाडाखाली आमच्या शेळ्या बांधायची जागा होती. तेव्हा मी चौथीच्या वर्गात शिकत होतो. बाकीचे सारे लहान भाऊ-बहीण घर संभाळत असे. आई गावातील धनगर आळीतल्या, बायांबरोबर रोज मजुरीसाठी कामाला जायची. माझ्या शाळेतले वर्गमित्र हेच माझे जीवाभावाचे सवंगडी. शाळा सुटल्यावर आम्ही कधी-कधी शाळेच्या मैदानावर खेळायचो, तर केव्हा-केव्हा सुट्टीच्या दिवशी आम्ही ओढ्याकाठी पांदीच्या रस्त्याने भटकंती करून रानमेवा खायचो, आणि उन्हाळयाच्या सुटीत दिवसभर ओढ्याच्या पाण्यात डुंबणे-खेकडे, मासे पकडणे. तसेच ओढयाकाठावरील झाडावरच्या होले-पारवे या पक्ष्यांची घरटी शोधून त्यातली अंडी वा पिल्लं पाहण्यात आम्हा सर्वाना आनंद वाटे. असा आम्हा साऱ्या मित्रांचा सुट्टीतला नियोजित कार्यक्रम असे.

बा ने इनामदाराकडून वृध्द गाय घरी आणल्यापासून मी फावल्यावेळेत त्या गायीला रानात- ओढयाकाठी चरायला नेत असे. आईसुध्दा शेळ्याबरोबर गायीलाही जास्तीचे गवत आणीत. दिवसेंदिवस गाईची चांगली देखभाल होऊ लागल्याने त्यामुळे गायीच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली. आता ती पहिल्यापेक्षा चांगली धष्टपुष्ट दिसाया लागली, आणि राखोळीमध्ये दररोज रानात चरायला जाऊ लागली. एक दिवस तिने एका वासरीला जन्म दिला. ती कालवड दिसायला फारच सुंदर होती. तिच्या पाठीवर सर्वत्र पांढरा रंग व त्या रंगावर जागोजागी लाल-लाल रंगाचे ठिपके होते. त्यामुळे हे वासरू साऱ्यांच्या नजरेत भरत असे. लांब सरळ मान, कमळाच्या कळीसारखे कान, लांब शेपूट, बर्फासारखे निळे डोळे, टुनुटुनु जागीच उडया मारणे आणि चालतांना हलत-डुलत चालत असे, त्यामुळे आम्ही साऱ्यांनी तिचे नाव, ''झुमरी,'' असे ठेवले. झुमरी म्हणजे डुलत चालणे.

झुमरी ही आमच्या गायीची माझी आवडती वासरी. मी झुमरीऽऽ अशी साद दिली की, ती ही मला हंबरून ओरडून प्रतिसाद द्यायची. मी चिंचेच्या झाडाखाली गेलो की, ती गळ्यातल्या दाव्यासह ओढून- ओढून माझ्याकडे येण्याचा प्रयत्न करी. जेव्हा मी तिच्याजवळ जाऊन तिच्या मानेला मळायचो, पाठीवर हात फिरवायचो, तेव्हा तिला फार बरे वाटे. मग ती पूर्ण मान माझ्या खांद्यावर ठेवायची आणि तोंडाने माझ्या मानेला, दंडाला चाटायची. कधी-कधी तर दोन्ही डोळे मिटून स्तब्ध उभी राहायची, आपण म्हणालो की, '' झुमरी आता बस्स झाले,'' की लागलीच दोन्ही कान टवकारून टकामका माझ्याकडे बघायची व शांत उभी राहायची. मी शाळेत किंवा घराबाहेर पडल्यावर भाँऽ भाँऽ असा आवाज द्यायची, आणि मी तिच्याकडे न पाहता सरळ तिच्या जवळून गेलो की, ती मान हलवून-हलवून एकसारखी माझ्याकडे पाहायची. जेव्हा मी तिच्या नजरेआड दिसेनासा झाल्यावरच ती शांत होऊन खाली बसायची.

झुमरी आता मोठी झाली. ती रानात चरायला जाऊ लागली. काही दिवसाने तिने एक वासराला जन्म दिला. तोवासरू रंगरूपाने झुमरीवरच गेला. सांज-सकाळी ती भरपूर दूध द्यायची. घरात चहासाठी दूध वापरूनही बरेच दूध शिल्लक राहत असे.ते दूध मोत्या कुत्र्याला व लालमनी मांजरीला रोज दुधाचा महाप्रसाद मिळायचा. त्यांचीही रोज दूध प्यायची मज्जा होत असे. मोती आणि लालमनी ही आमची पाळलेले कुत्रा व मांजर होते.

शेवटी झुमरीला आमच्या घरातल्या एका कुटूंबातली व्यक्ती म्हणून गणना होऊ लागली. परंतु झुमरीला कुणाची नजर लागली हे कुणास ठाऊक. गावातल्या कोणीतरी अज्ञात व्यक्तीला झुमरीचे जगणे पाहवले गेले नाही, आणि त्याने सूडबुध्दीने आमच्या साऱ्यांच्या गैरहजरीत कोणती तरी विषारी पदार्थ झुमरीच्या खाण्यात टाकले. आम्ही तिला घरगुती बरीच औषधी पाजली. गुरांच्या वैद्याला दाखविले, परंतु यश आले नाही. झुमरीचा त्रास सारखा-सारखा दिवसेंदिवस वाढायचा तिच्या पोटात काय दुखत होते, हे कळत नव्हते, तिला खूप वेदना होत होत्या. म्हणून ती सारखी-सारखी जोराजोराने हंबरडा फोडून ओरडायची तिचे दुखणे हे कोणत्याही वैद्यांच्या वा गुरांच्या जाणकारांच्याही लक्षात येत नव्हते. कारण पूर्वी आजच्यासारखी आधुनिक उपचार पध्दती नव्हती. बा नेही खूप प्रयत्न केले परंतु यश काही आले नाही.

जेव्हा-जेव्हा ती हंबरडा फोडून केविलवाणी ओरडायची, तेव्हा तर माझ्या काळजाचे पाणी-पाणी व्हावयाचे पण इलाज नव्हता. मी तिच्याजवळ गेल्यावर ती डोळ्यातून पाणी गाळून हंबरून ओरडायची, तसतसे माझे मन मला खायला उठायचे आणि ज्या व्यक्तीने ह्या मुक्या प्राण्यासंगे असे कपट कारस्थाने केले, मला त्याचा फार राग यायचा आणि मी त्याच्या नावाने स्वतःशीच त्याला भले-बुरे बोलायचो.

एके दिवशी मी शाळेत गेलो. चार वाजेला माझी शाळा सुटली. आमच्या घराजवळच्या चिंचेखाली लहान मुले-मुलींची गर्दी व दोन- चार शहाणी माणसे झुमरीजवळ जमा झालेली मला दिसली. झुमरीने दोन्ही हातपाय ताणून देऊन ती खाली कोसळली. मी धावत-धावत गेलो, आणि झुमरी अशी साद दिली. झुमरीने माझा आवाज ओळखला आणि मी तिची मान माझ्या मांडीवर घेतली. तिने शेवटचा केविलवाणा हंबरडा फोडला आणि तिचे डोळ्यातून टपटप अश्रु माझ्या मांडीवर पडत होते. शेवटी तिने जोरात हातपाय ताणले व पुन्हा एक हंबरडा फोडला आणि माझ्या मांडीवर प्राण सोडला...! नकळत झुमरीसाठी माझ्याही डोळ्यातील अश्रु मला अनावर झाले.आणि माझ्या डोळ्यातून गंगा-यमुना वाहू लागले.



**बाल साहित्य**
**अय्युब पठाण लोहगावकर**
पैठण मो.९७६४३ ५०३७४

# मुले म्हणजे यंत्रे नव्हेत....



विद्यार्थ्यांशी हितगुज
**लक्ष्मण जगताप,**
**बारामती**
संपर्क : ९४२३२ ४९९९६

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

प्रत्येक मुलाला जन्मतःच काही नैसर्गिक क्षमता मिळालेल्या असतात.त्या विकसित होण्यासाठी पूरक वातावरण तयार करणे हे पालक आणि शिक्षकांचे काम असते. मुलांना प्रेरित केल्याने मुलांच्या अंगी असलेली कौशल्ये विकसित होतात.कोणत्याही उपक्रमात, स्पर्धेत भाग घेताना मनापासून तयारी करावी. प्रयत्न करून सहभागी झाल्याचा आनंद मानावा. यश मिळाले तर आनंद जरुर मानावा पण अपयश आले म्हणून निराश होऊ नये.

आजचे युग प्रचंड अशा जीवघेण्या स्पर्धेचे आहे. त्यात आपला पाल्य टिकला पाहिजे अशी पालकांची इच्छा असते. यासाठी स्पर्धेत उतरवून त्याला पळवले जाते. कधी त्याची इच्छा असते किंवा नसते.पण स्पर्धेत उतरावे लागते. यावेळी त्याच्या अंगभूत क्षमता आणि कौशल्ये पाहिली पाहिजेत.परंतु पालक याकडे दुर्लक्ष करतात.

समाजात माझे कौतुक झाले पाहिजे.मला सतत कुणी तरी चांगले म्हटले पाहिजे. आपली इच्छा, आकांक्षा मुलांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादले जाते.

दुसऱ्याशी तुलना केली जाते. पाल्य मागे पडतोय काय ? अशी भीती पालकांच्या मनाला सतावत राहते.त्यातून मुलांवर प्रचंड ताण येतो. कधीकधी पूर्ण क्षमता किंवा कौशल्य वापरुन अपयश आल्यावर मुलांना व पालकांना ते पचविणे जड जाते.याचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

मुलांना प्रोत्साहन द्यावे.पण त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादू नये.एखाद्या उपक्रमात, स्पर्धेत त्याला निकोप आणि मुक्तपणे भाग घेऊ द्यावा.यश अपयश हा नंतरचा भाग असतो.

वयाच्या त्या -त्या टप्प्यावर मुले सरावाने आणि प्रयत्नाने कौशल्ये प्राप्त करुन पुढे जात असतात.

प्रत्येक मूल हे वेगळे असल्याने प्रत्येकाची बौद्धिक क्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे एकमेकांची तुलना करणे गैर ठरते. तसेच मुलांकडून अवास्तव अपेक्षा ठेवण्याचा विचारही चुकीचा असतो. खरं तर त्यांच्या भाव भावना समजून घेणे आणि त्यांना विश्वास देणे गरजेचे असते.

मुलांच्या अंगी असणाऱ्या कौशल्यांना प्रेरणा देणे हे खूप महत्त्वाचे असते.त्यामुळे मुलांना चैतन्य आणि ऊर्जा मिळते.त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो.

***




## उच्चभ्रू सोसायटी...

चोराची काय होती बिशाद...
सैफ एखाद्या चाळीत राहता तर ! ?
मध्यरात्रीही चोरास पकडून बदडते....
चाळीतील आबालवृद्ध मरेस्तोवर !
सारेच मदतीस धावले असते...
बाया माणसं नि लहान थोर !
रिक्षा ना भेटती तर आमचीच टारगट पोरंटोरं....
घेऊन गेली असती सैफला अलगद कडे, खांद्यावर !!!
एक तास चोराचा धुडगूस चालू...
पण शेजाऱ्या पाजाऱ्यांस ना खबर !
साऱ्यांचे किंमती सीसीटीव्ही जागे...
रोखून बसलेले आपली किंकर्तव्यमूढ नजर !
पडद्यावर एका बुक्कीत दहा दुष्मन लोळविणारे....
धावून ना आले सलमान, शाहरुख वा शहीद कपूर !
करीना लेकरांना घेऊन घरातच दडलेली....
एकटीलाच पार पाडावे लागले सोपस्कार !!!
खुट्ट आवाज होताच जागी होणारी चाळ...
जागत बसली असती रात्रभर !
फाटक्या बनियन, अंडरपँटवरही
धावत आले असते चाळकरी...
मध्यरात्रीही मदतीस तत्पर !
गडगंज पैसाही ना कामी आला....
ना कुबेरासारख्या धनाढ्यांचा भावनाशून्य शेजार !
काय चाटायची ही उच्चभ्रू सोसायटी...
जिथं आपला खून झाला तरी
आपल्यालाच द्यावी लागते खबर....
अन् आपल्यालाच जळावं लागतं,
आपणच रचलेल्या सरणावर !!!

**– मदन महाजन**

## घंटा वाजली... (बालकाव्य)

टण टण बेल वाजली
धूम ठोकून मुले पळाली

शि शी शी शिट्टी वाजली
मुलींनी मग टाळी पिटली

गोल गोल सगळी बसली
चुळ चुळ मुंगळा म्हणू लागली

कॉलर पकडून मुले पळाली
साखळी तुटता बदड बदडली

मैदानावर कब्बडी रंगली
अर्धा तास भरल्या दंगली

शिवणा पाणी, वांग टांग
चोर शिपाई, अन् लपंडाव

वेगवेगळे खेळ खेळले
डब्बे सोडून सगळे बसले

घंटा झाली शिटी वाजली
मुले आता वर्गात बसली

मास्तर मंडळी तासाला गेली
सारी कशी ताजेतवाने झाली...

अख्खी शाळा शांत बसली
उशीरा आलेल्यांनी छडी घेतली

**– दत्ता तरलगट्टी**
पंढरपूर. ९८८१६२९०४८




## माकडा रे माकडा

माकडा रे माकडा
करतोस तू हुप हुप
झाडावरील फळं खाऊन
मस्ती करतोस खूप

या झाडावरून त्या झाडावर
मारतोस तू उड्या
छतावरील कौलारू फोडून
करतोस तू खोड्या

समोरचे पाय म्हणजे
जणू तुझे हात
उंच शेंड्यावर जाऊन
बसतोस आंबे खात

मजा वाटते भारी
लांब शेपटी पाहून
कुणी खोडी केली तर
येतोस अंगावर धावून

माकडा रे माकडा
पुरे झाली तुझी मस्ती
झाडावरुन उतरून
कर आमच्याशी दोस्ती

**– रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## नभाची चांदणी ती

जशी नयनात येते
तशी हृदयात येते.

नभाची चांदणी ती
उगी स्वप्नात येते.

नदीचा काठ वळतो
तशी घाटात येते.

सुखाचा फास दिसता
पुन्हा जाळ्यात येते.

चमकत्या काजव्यांची
परी रानात येते.

जसा एकांत मिळतो
तशी शहरात येते.

पडे जर गाठ माझी
छबी लाडात येते.

पुण्याची रोषणाई
अता गावात येते.

सख्याची भेट ठरता
परी स्वर्गात येते.

**–रज्जाक शेख**
९६६५७७८५५८

## स्वामी विवेकानंद नरेंद्रजी

वेद प्रसारक योग प्रचारक
संन्यास धारक नरेंद्रजी

प्रभावी सुभाष्य रामकृष्ण शिष्य
स्थितप्रज्ञ दृश्य नरेंद्रजी

व्यक्तित्व तेजस्वीसाधक तपस्वी
वाणी ओजस्वी नरेंद्रजी

अविचल चंगयुवा दीपस्तंभ
अव्हेरला दंभ नरेंद्रजी

सामाजिक भान वृद्धिंगत त्राण
सुधारणा गान नरेंद्रजी

संस्कारांचा ठेवा ध्यानमग्न युवा
सद्गुण दुवा नरेंद्रजी

युवक हर्षक सन्मार्ग दर्शक
देह आकर्षक नरेंद्रजी

संस्कृती वर्धक वाचा समर्पक
विवेक दर्पक नरेंद्रजी

थोर ज्ञानवान तन शक्तिमान
मन ध्यानवान नरेंद्रजी

अमर विभूती ब्रम्हांडात श्रुती
निष्कलंक स्मृती नरेंद्रजी

**– मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल,**
छत्रपती संभाजीनगर

## मागे वळून पाहता

मागे वळून पाहता,
आता कळले किती पूढे आलो.
किती वळणे घेतली, किती पार केले रस्ते.
किती सोडले ओंजळीतून,
किती निसटले मुठीतूनी उमजलेच नाही.
काय धरले काय सोडले,
बेरीज वजाबाकीचे गणीत
कधी जुळलेच नाही मागे वळून पाहता,
आता कळले किती पूढे आलो.

किती पाहिले पावसाळे,
किती सोसले ऊन्हाळे
धूक्यातूनही पार केली बिकट वहिवाट.
जोडता येईल तेवढे जोडले,
तोडले मात्र काहीच नाही
वेचता येईल ते ते वेचले,
जपण्याचा छंद मात्र सोडला नाही.
मागे वळून पाहता,
आता कळले किती पूढे आलो.

कधी भरती कधी ओहटी,
कधी होता पाठशिवणीचा खेळ
कितीदा घातली ह्या मनाला मुरड,
अन केली बऱ्याचदा तडजोड.
स्वप्ने बरीच हवेतच विरली,
ना केली कधी खंत, ना केला कधी खेद.
कथा कुणा सांगितली नाही,
व्यथा कुणी जाणली नाही.
मागे वळून पाहता,
आता कळले किती पूढे आलो.

**शेखर देशपांडे,**
छ. संभाजीनगर

हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559